शुक्रवार, दि. २५ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २६१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ | 8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282





पहेलगाम हल्ल्यात निष्पाप पर्यटकांचा बळी गेल्याच्या घटनेचा निषेध व्यक्त करत सकल हिंदू समाज जालनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून शांतता मार्च काढण्यात आला. (छाया अनिल व्यवहारे)

## 'जेईएस वसंतोत्सवा'त संगीत, नृत्य-नाट्याने रंगणार दोन दिवस

**जालना । प्रतिनिधी -** येथील जेईएस महाविद्यालयात दिनांक २६ आणि २७ एप्रिलरोजी भव्य 'जेईएस वसंतोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. हा दोन दिवसीय सांस्कृतिक महोत्सव संगीत, नृत्य - नाट्याने रंगणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी दिली. याप्रसंगी डॉ. महिनी रायबागकर, डॉ. यशवंत सोनुने, सतीश लिंगडे, सुमित शर्मा यांची उपस्थिती होती.

शनिवार, (दि . २६) रोजी सायंकाळी ६ वाजता महाविद्यालयाच्या चुन्नीलाल गिरीलाल सभागृहात या म होत्सवाचा उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यासाठी प्रमुख उद्घाटक म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील नाट्यशास्त्र विभागाचे निवृत्त विभागप्रम ुख आणि जेष्ठ रंगकर्मी डॉ. जयंत शेवतेकर उपस्थित राहणार आहेत. तसेच, प्रमुख पाहुणे म्हणून जालना येथील प्रसिद्ध उद्योजक घनश्यामजी गोयल आणि प्रमुख उपस्थिती म्हणून जालना एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्रीनिवासजी भक्कड लाभणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तमजी बगडिया भूषवणार आहेत.

उद्घाटन समारंभानंतर लगेचच सुप्रसिद्ध नृत्यांगना ईशिता व ईशानी कुलकर्णी या मृगनयनी भगिनी 'वाल्मिकी वाणी - चिरंजीवकाव्य' या संकल्पनेवर आधारित मोहक नृत्य सादर करणार आहेत. त्यांच्या विषयानुरूप नृत्याविष्काराने कार्यक्रम ात रंगत येणार आहे.

दुसऱ्या दिवशी, रविवार (दि. २७) रोजी सायंकाळी ७ वाजता उत्कर्ष थिएटर्स जालना आणि नाट्यांकुर जालना यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासन राज्यनाट्य स्पर्धेत विजेते ठरलेले दोन अंकी नाटक 'घोळमटण' सादर केले जाणार आहे. सतीश लिंगडे यांचे लेखन आणि सुमीत शर्मा यांचे दिग्दर्शन असलेला हा नाट्यप्रयोग रसिकांसाठी एक अविस्मरणीय अनुभव असेल.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी शहरातील सर्व रसिकांना या बहुरंगी आणि मनोहारी सांस्कृतिक सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याचे आग्रहाचे निमंत्रण दिले आहे.

**ठळक मुद्दे:** जेईएस महाविद्यालयात २६ व २७ एप्रिल रोजी 'जेईएस वसंतोत्सवा'चे आयोजन., संगीत, नृत्य आणि नाट्याविष्काराची मेजवानी., उद्घाटन समारंभास डॉ. जयंत शेवतेकर प्रमुख उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार., ईशिता व ईशानी कुलकर्णी यांचे नयनरम्य नृत्य सादरीकरण., राज्यनाट्य स्पर्धेतील विजेते नाटक 'घोळमटण' सादर होणार., कार्यक्रम स्थळ: चुन्नीलाल गिरीलाल सभागृह, जेईएस महाविद्यालय, जालना.

## पहलगाम आतंकवादी हल्ल्याच्या निषेधार्थ सोशल डेमॉक्रॅटिक पार्टीचा कॅन्डल मार्च



**जालना । प्रतिनिधी -** पहलगाम येथील आतंकवादी हल्ल्याच्या निषेधार्थ मामा चौक ते सिंधी बाजार चौक पर्यंत कॅन्डल मार्च काढण्यात आला. सोशल डेमॉक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने बुधवार (दि २३) रोजी रात्रीच्या सुमारास कॅन्डल मार्च काढण्यात आला.

या कॅन्डल मार्चमध्ये शेकडो नागरीक सहभागी झाले होते. या कँडल मार्च मध्ये नागरीकांनी हातात मेणबत्ती घेऊन पाकिस्तानी अतिरेक्यांचा जाहीर निषेध नोंदवत अतिरेक्यांवर कारवाईची मागणी केली. पहलगाम मध्ये आतंकवाद्यांनी हल्ला केला. यात २८ पर्यटकांची हत्या करण्यात आली. या घटनेचा सर्वत्र निषेध करण्यात येत आहे. त्याच पान २ वर

युवा आदर्श

### धर्म...

प्रत्येकां प्रियतम
असे आपला धर्म
श्रध्दास्थान पवित्र
जाणती सारे मर्म
नाजूक असे बाब
जपून करावे कर्म
पाळा काही पथ्ये
त्यात कशी शरम
सगळ्या धर्मांमधे
असे जरा साधर्म्य
कमी जास्त काही
भले बुरे गुणधर्म
धर्मांध होऊ नका
जाणा एवढे मर्म
सर्वधर्मांचा आदर
पाळा शेजार धर्म
अतिरेक धर्मांचा
गाठे सिमा चरम
माणसे होई पशू
वाता वरण गरम
हिंसाचारी दंगली
माजू लागे उधम
भडकावयां आगी
तयार असे अधम
सर्वधर्म समभाव
हाती घडो सत्कर्म
खोल विचार करा
घडणार न कुकर्म

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## अतिरीक्त आयुक्त प्रियंका राजपूत यांच्यावर कारवाई करा, अन्यथा रस्त्यावर उतरू

### वंचित बहुजन आघाडीची पोलीस अधीक्षक आणि स्थानिक गुन्हे शाखेकडे मागणी



**जालना । प्रतिनिधी -** म हापालिकेच्या अतिरीक्त आयुक्त प्रियंका राजपुत यांनी जालना शहरात गैर कारभार चालवला आहे. त्यांच्या गैरकारभाराची जालना शहरातील जनतेत जोरदार चर्चा रंगली असून त्यांच्या मनम ानी कारभाराबद्दल ओबिसी संघर्ष योध्दा आणि ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी जनतेची बाजू घेऊन त्यांच्या गैर कारभारावर बोट ठेवले आहे. राजपूत यांच्या मनमानी कारभाराची बातमी संपादक सय्यद अफसर यांनी लावली म्हणून प्रियंका राजपूत यांनी ओबीसीचे संघर्ष योध्दा नवनाथ वाघमारे आणि युट्यूब चॅनलचे संपादक सय्यद अफसर यांच्याविरोधात कदीम जालना पोलीस ठाण्यात खोटी तक्रार दाखल केली. त्याबद्दल प्रियंका राजपुत यांचा या निवेदनाद्वारे वंचित बहुजन आघाडी आणि ओबीसी समाज बांधव जाहीर निषेध करीत आहे. राजपुत यांनी केलेली तक्रार खोटी असल्यामुळे त्यांच्यावर पान २ वर

## हिन्दू महासभा बावने पांगरी सर्कल प्रमुख पदावर डिघे पाटील यांची निवड



**बदनापुर । प्रतिनिधी -** तालुक्यातील बावने पांगरी सर्कल प्रमुख पदावर भिमराव डिघे पाटील यांची निवड तालुका प्रमुख माजी सरपंच संजय डिघे पाटील यांनी केली आहे. बदनापुर तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ता भिमराव डिघे पाटील यांची हिंदुत्वनिष्ठ म्हणून ओळख असुन बदनापुर तालुक्यातील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी श्री. डिघे पाटील यांची प्रदेश संघठन मंत्री धनसिंह सुर्यवंशी व देवगिरि प्रांत प्रमुख ॲड. ईश्वर बिल्होरे यांच्या सुचनेनुसार तालुका प्रमुख माजी सरपंच संजय डिघे पाटील यांनी भिमराव डिघे पाटील यांची बावने पांगरी सर्कल प्रमुख पदावर निवड केली त्यांच्या निवडी बद्दल सर्व स्तरातुन अभिनंदन करण्यात येत आहे.

## बातमीचा राग धरून पोलिसांत खोटी तक्रार करणाऱ्या प्रियंका राजपूतची हकालपट्टी करा

### पत्रकारांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी; अन्यथा राज्यभर आंदोलन करण्याचा ईशारा




**जालना । प्रतिनिधी -** येथील महानगर पालिकेमध्ये रुजु झाल्यापासून अनेक विषय आणि प्रकरणांमध्ये वादग्रस्त ठरलेल्या जालना शहर महानगर पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत यांच्या बाबत पत्रकार सय्यद अफसर यांनी बातमी प्रकाशित केली. म्हणून पत्रकारांचा आवाज दाबण्यासाठी प्रियंका राजपूत यांनी त्यांच्या विरोधात कदीम जालना पोलिस ठाण्यात खोटी तक्रार दिलेली आहे.तसेच वादग्रस्त अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत यांच्यावर झालेल्या आरोपाची प्रतिक्रीया घेण्यासाठी पत्रकार सय्यद अफसर गेले असता त्यांना अपमानीत करुन धमकी दिली. त्यामुळे प्रियंका राजपूत यांची हकालपट्टी करा, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन करू असा ईशारा गुरुवार (दि २४) पत्रकारांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, महापालिका आयुक्तांना निवेदनाच्या माध्यमातून दिला आहे. राजपूत यांनी पोलीस स्टेशनमध्ये खोटी तक्रार दिली असून ही तक्रार तत्काळ रद्द करण्यात यावी आणि वादग्रस्त प्रियंका राजपूत यांची जालना महानगर पालिकेतून तात्काळ हकालपट्टी करण्यात यावी, नसता पत्रकार संघटनाकडून राज्यभरात लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल. असा ईशारा पत्रकारांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, पोलीस अधीक्षक, जालना महापालिकेचे आयुक्त यांना निवेदन देण्यात आले.

दिलेल्या निवेदनावर विकासकुम ार बागडी,सुयोग खर्डेकर,रविकांत दानम,शब्बीर पठाण, नाजिम मणियार, आमेर खान, शेख सलीम, सुनील भारती, सय्यद अफसर, देवचंद सावरे, सचिन सर्वे, शेख मुजीबुद्दीन, कादरी हुसेन, विजय साळी, अर्शद मिर्झा, आकाश माने, विकास काळे, श्रीकिशन झंवर, बाबासाहेब नरवडे, बासीत बेग, शेख इलियास अब्बास, भगवान निकम, गौतम वाघमारे, दिनेश नंद, शेख मुसा, सुनील खरात, लियाकत अली खान, शेख उमर, युवराज कुरील, गणेश जाधव, धनसिंह सुर्यवंशी,योगेश काकफळे, संजय आहेर इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# संपादकीय

## सार्वभौमत्वावर हल्ला !

काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० वे कलम हटवून केंद्र सरकारने काश्मीरचे त्रिभाजन केले. या घटनेला या ऑगस्ट मध्ये सहा वर्ष पूर्ण होतील. ३७० वे कलम हटवल्यानंतर काश्मीरमध्ये अनुचित प्रकार घडू नये यासाठी काश्मीरमध्ये कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. कडेकोट सुरक्षा व्यवस्था असल्याने काश्मीरमध्ये बराच काळ शांतता होती त्यामुळे पर्यटनालाही चालना मिळाली होती. त्यामुळे नंदनवनात पुन्हा शांतता प्रस्थापित झाली असा समज निर्माण झाला होता मात्र या समजाला छेद देणारी घटना काश्मिरात घडली आहे. जम्मू काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्यात २८ पर्यटक ठार झाले. या हल्ल्यात अनेक पर्यटक जखमी झाले. ठार झालेल्या पर्यटकात महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा समावेश आहे. या हल्ल्याने देशभर संतापाची लाट उसळली आहे . पहलगाम येथे झालेला हा हल्ला भारताच्या सार्वभौमत्वावर झालेला हल्ला आहे. या हल्ल्याने काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी पुन्हा डोके वर काढले असून काश्मीरमध्ये पुन्हा घातपाती कारवाया सुरू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या हल्ल्याने सहा वर्षापूर्वी काश्मीरमधीलच पुलवामा येथे झालेल्या हल्ल्याची आठवण झाली. सहा वर्षापूर्वी पाकिस्तानच्या जैश ए मोहंमद या दहशतवादी संघटनेने भारतीय जवानांवर केलेल्या हल्ल्यात ४० हून अधिक जवान शहीद झाले होते. पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात दहशतवाद्यांनी पर्यटकांना त्यांचा धर्म विचारुन ठार केले. दहशतवाद्यांनी हिंदू पर्यटकांना जाणीवपूर्वक टार्गेट करून ठार केले. याचाच अर्थ हा टार्गेट कीलींगचा प्रकार आहे. काश्मीरमध्ये टार्गेट किलिंगचा हा पहिलाच प्रकार आहे असे नाही. मागील वर्षी जम्मू काश्मीरच्या दिवसी जिल्ह्यातील कंदा परिसरात वैष्णवदेवीच्या दर्शनासाठी जात असलेल्या भाविकांच्या बसवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला होता त्यात १० भाविक मरण पावले तर ३३ हून अधिक भाविक जखमी झाले होते. पहलगाम येथे झालेला हल्ल्याला गेल्या काही दिवसात काश्मीरमध्ये झालेला सर्वात मोठा भीषण हल्ला म्हणता येईल अर्थात काश्मीर खोऱ्यात कडेकोट बंदोबस्त असूनही लहान मोठे हल्ले चालूच होते मात्र या हल्ल्याने काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवादी मोठ्या प्रमाणात सक्रिय झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या हल्ल्याने दहशतवाद्यांनी केंद्र सरकारला दाखवून दिले आहे की काश्मीरमध्ये दहशतवाद अजूनही कायम आहे. केंद्र सरकारने हा हल्ला गांभीर्याने घेतला असून या हल्ल्याची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. भारताचे पंतप्रधान, गृहमंत्री, संरक्षणमंत्र्यांनी हा हल्ला पाकिस्तान पुरस्कृतच असून या हल्ल्याला जशास तसे उत्तर दिले जाईल असा इशारा दिला आहे. पाकिस्तानने मात्र हे पाप आमचे नाही असे म्हटले आहे. पाकिस्तान काहीही म्हणो मात्र हा हल्ला पाकिस्तान पुरस्कृतच होता हे शाळकरी मुलेही सांगतील. सुंब जळाला तरी पिळ जात नाही ही म्हण पाकिस्तानसाठी तंतोतंत लागू पडते. पाकिस्तान आज अक्षरशः भिके कंगाल झाला आहे. पाकिस्तानी सरकार कटोरा घेऊन जगभर फिरत आहे मात्र त्यांना कोणीही भिक द्यायला तयार नाही . पाकिस्तानमधील जनता अक्षरशः देशोधडीला लागली आहे. एकवेळचे पोटभर अन्न मिळाले तरी पुरेसे अशी त्यांची अवस्था आहे. आपल्या देशातील नागरिकांना खायला मिळत नसताना तेथील सरकार मात्र दहशतवाद्यांना पोसत आहे. पाकिस्तान सरकार आजही दहशतवाद्यांना आर्थिक आणि लष्करी मदत करत आहे. पाकिस्तानच्या सीमावर्ती भागात आजही दहशतवाद्यांचे अड्डे सुरू आहेत. तिथे पाकिस्तानी लष्कर दहशतवादी संघटनांना प्रशिक्षण देत आहे. अनेक दहशतवादी संघटनांची कार्यालये पाकिस्तानात आहेत अशाच एका दहशतवादी संघटनेने हा भ्याड हल्ला केला असण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने या भ्याड हल्ल्याची गांभीर्याने दखल घेऊन पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यावे. जर भारताने या दहशतवादी हल्ल्याला प्रतिउत्तर दिले नाही तर दहशतवाद्यांची मुजोरी आणखी वाढेल आणि काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवाद पसरेल. ते होऊ द्यायचे नसेल तर भारतानेही आक्रमक व्हायला हवे. प्रसंगी सर्जिकल स्ट्राईक सारखा पर्याय वापरायलाही हरकत नाही. भारताने पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतानाच या दहशतवाद्यांना साथ देणाऱ्या फुटिरतावाद्यांचा देखील बंदोबस्त करावा. काश्मीरमधील अनेक फुटीरतावादी नेते दहशतवाद्यांना साथ देतात. स्थानिक फुटीरतावादी लोकांची साथ असल्याशिवाय इतका मोठा हल्ला करणे दहशतवाद्यांना शक्य नाही त्यामुळे दहशतवाद्यांशी दोन हात करताना आणि पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतानाच केंद्र सरकारने ही फुटिरतावादी कीड देखील मुळापासून उखडून टाकायला हवी. आज जरी हा दहशतवादी हल्ला भारतात झाला असला तरी दहशतवाद ही केवळ भारताचीच समस्या नाही तर ती वैश्विक समस्या आहे. दहशतवाद आज जगातील प्रत्येक देशाचे दार ठोठावत आहे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी जपान, रशिया, ऑस्ट्रेलिया या प्रगत देशांनाही दहशतवादाची झळ बसली आहे म्हणूनच दहशतवादाचा मुकाबला करायचा असेल तर जगातील सर्व देशांना एकत्र यावेच लागेल. पाकिस्तान सारखा देश जो सातत्याने दहशतवादाला प्रोत्साहन देतो, दहशतवाद्यांना मदत करतो अशा देशांवर आंतरराष्ट्रीय समूहाने कारवाई करावी. पाकिस्तान सारख्या दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या देशांवर आंतरराष्ट्रीय समूहाने आर्थिक निर्बंध आणावेत. प्रसंगी त्या देशांवर बहिष्कार टाकून त्यांची कोंडी करावी. दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या देशांची कोंडी केल्याशिवाय दहशतवाद संपणार नाही. अमेरिकेसारख्या सुपर पॉवर देशांनी त्यासाठी पुढाकार घ्यायला हवा.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## श्री विनोद मोरे यांचा जनता दल मध्ये प्रवेश सोहळा संपन्न

**मुंबई -** येथील जनता दल महाराष्ट्र प्रदेश कार्यालय येथे जनता दल प्रदेशाध्यक्ष नाथाभाऊ शेवाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत बळीराजा राष्ट्रीय सचिव व मकर ध्वज संस्थेचे संस्थापक राज्यसेवक विनोद जी मोरे यांचा जनता दल पक्षामध्ये प्रवेश करण्यात आला श्री विनोद मोरे यांना जनता दल महाराष्ट्र प्रदेश सचिव पद देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी प्रदेश उपाध्यक्ष सुहास बने, मुंबई अध्यक्ष प्रभाकर नारकर, सलीम भाटी, मधुकर जोशी यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते

# चला हिवतापाला संपवु याः पुन्हा योगदान द्या

दरवर्षी प्रमाणे जागतिक हिवताप दिन २५ एप्रिल २०२५ रोजी साजरा करण्यांत येतो. यानिमित्त संपुर्ण जिल्ह्यात हिवताप जनजागरण करण्यात येते. डासांमुळे हिवताप, डेंग्यू, चिकुनगुन्या, झिका, जे.ई., हत्तीरोग यासारखे जीवघेणे आजार पसरतात. हिवताप, डेंग्यू झाल्यास रुग्ण शासकिय अथवा खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेतो. परंतु सदरील किटकजन्य आजार होऊ नये याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविणे अत्यंत आवश्यक आहे. सन २०२७ अखेर हिवताप दुरीकरण करायचे असल्याने ध्येय व नियोजन आवश्यक आहे. या वर्षीचे घोषवाक्य'चला हिवतापाला संपवु याः पुन्हा योगदान द्या, पुर्नेविचार करा, पुन्हा सक्रिय व्हा' असे आहे

हिवतापाचे लक्षणे : थंडी वाजुन ताप येणे, घाम येणे, उलटी, डोकेदुःखी, एक दिवस आड ताप. हिवताप ऑनाफिलीस दुषित मादी मच्छर चावल्यामुळे होतो. किटकजन्य आजारांचा प्रसार करणाऱ्या डासांची उत्पत्ती साचलेल्या पाण्यात होत असते. डास हा साचलेल्या पाण्यात अंडी घालतो. अंडी, अळी, कोष व डास या चार अवस्थेतुन ८ ते १० दिवसांत नवीन डास जन्माला येतो. दुषित मादी डास निरोगी व्यक्तीला चावला की, डास चावतांना मानवाच्या रक्तामध्ये जंतु सोडतात. दुषित एनॉफिलस मादी मच्छर चावल्यामुळे हिवताप हा आजार होतो. महाराष्ट्रामध्ये साधारणतः प्लाझमोडियम व्हाव्हॅक्स (पी. व्ही.) व प्लाझमोडियम फॅल्सीफरम (पी.एफ.) असे दोन प्रकारचे हिवताप रुग्ण आढळुन येतात. रक्ताच्या तपासणी मध्ये हिवतापाचे निदान होते. हिवताप दुषित पी.व्ही. किंवा पी.एफ.आढळुन आल्यानंतर त्याप्रमाणे औषधोपचार करुन १०० टक्के रुग्ण बरा होतो.

डास प्रामुख्याने ३ प्रकारचे आहेत. १) ऑनॉफिलीस डास हा हिवतापाचा प्रसार करतो, त्यांची उत्पत्ती स्वच्छ पाणीसाठयांमध्ये होते. उदा. नदी, हौद, नाले, विहिरी, तळी. २) एडिस डास हा डेंग्यू, चिकूनगुन्या व झिका या आजारांचा प्रसार करतो, त्याची उत्पत्ती ही घरातील स्वच्छ पाणीसाठयांमध्ये होते. उदा, पाण्याच्या टाक्या, बॅरल, रांजण, हौद, फुटके डबे, निरुपयोगी टायर, नारळाच्या करवंटयामध्ये साचलेले पावसाचे पाणी, घर आणि परिसरात साठलेले किंवा साठविलेले स्वच्छ पाणी, घरातील कुलर, फ्रिजच्या ड्रीप ट्रे मधील पाणी, मनी प्लॅन्ट मधील स्वच्छ पाणी इ. ठिकाणी होत असते. ३) क्यूलेक्स डास हा हत्तीरोगाचा प्रसार करतो, त्याची उत्पत्ती ही अस्वच्छ पाणीसाठयांमध्ये होते, उदा. शौचालयाच्या सेप्टीक टँक, तुंबलेली गटारे, पाण्याचे डबके इ.

हिवताप व इतर किटकजन्य आजारांचा प्रसार रोखणे, स्वतःचा डासांपासून बचाव करण्यासाठी जनतेने खालीलप्रमाणे दक्षता घेणे आवश्यक आहे. १) ताप आल्यास त्वरीत डॉक्टरांकडे जावे, डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे आवश्यक चाचण्या कराव्यात. शासकिय रुग्णालयात यासाठी मोफत रोगनिदान व औषधोपचार उपलब्ध आहेत. २) डासोत्पत्ती स्थाने नष्ट करणे अथवा गप्पी मासे सोडणे. ३) घराच्या शौचालयाच्या सेप्टीक टँकच्या व्हेंन्ट पाईपला (गॅस पाईप) जाळी अथा कापड बांधावे. यामुळे डासांची उत्पत्ती रोखली जाते. ४) घर व परिसरामध्ये स्वच्छता ठेवावी. ५) गच्चीवरील पाण्याच्या टाक्यांना घट्ट झाकणे बसवावीत. ६) घरातील पाण्याच्या टाक्या/रांजण/बॅरल हौद हे आठवडयातून किमान एकदा घासून पुसून स्वच्छ कोरडे करावेत व ते घट्ट झाकणाने आणि कापडाने नेहमी झाकून ठेवावेत. ७) घरातील/ गच्चीवरील/घराच्या परिसरातील भंगार सामान/फुटके डबे/वस्तू / निरुपयोगी टायर याची विल्हेवाट लावावी. या सामानात पावसाचे पाणी साचते व त्या ठिकाणी डासांची उत्पत्ती होते. ८) घरातील कुलर, मनी प्लॉंट / चायनीज प्लॉंटमधील पाणी आठवडयातून किमान एकदा बदलावे स्वच्छ करुन पुन्हा भरावे. ९) झोपतांना मच्छरदाणीचा वापर करावा, पूर्ण अंग झाकले जाईल असे कपडे वापरावेत. १०) डासांपासून संरक्षणासाठी घराच्या दारे खिडक्यांना जाळ्या बसवाव्यात, क्रिम, मॅट, कॉईलचा वापर करावा. ११) फ्रिजचा ट्रे मधील पाणी वेळोवेळी काढून टाकावे. १२) गच्चीवर / अंगणात / घराच्या परिसरात कोठेही पाणी साचणार नाही, याची दक्षता घ्यावी. १३) आरोग्य कर्मचारी/आशा यांना सहकार्य करणे. वरिल प्रमाणे दक्षता सर्वांनी घेतल्यास आपण किटकजन्य आजारांचे प्रमाण नियंत्रणात ठेवू शकू. जागतिक हिवताप दिन यशस्वीपणे राबविण्यासाठी संपुर्ण जिल्ह्यात हस्तपत्रिका वाटप, आशा वर्कर बळकटीकरण कार्यशाळा, ग्रामीण आरोग्य पोषणहार व स्वच्छता समिती सभा, स्वच्छता मोहिम, गप्पी मासे सोडणे, बचत गटांच्या सभा, सेन्सटायजेशन मिटींग, रॅली इत्यादी वरील प्रमाणे कार्यक्रम संपुर्ण जिल्ह्यात सर्व शासकीय आरोग्य संस्थेमार्फत ' जागतिक हिवताप दिन ' साजरा करण्यात येणार आहे.

**- डॉ.जयश्री भुसारे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना.**

# खरंच आपण माणूस आहोत का?

एकेकाळी पृथ्वीतलावर माणसाला माणूस फार महत्त्व द्यायचा. माणूस माणुसकीला जिवापाड जपायचा. तेव्हा माणुसकी कलंकित करणाऱ्या माणसाला कठोर शिक्षा दिली जायची. त्याला समाजातून व गावातून कायमचे हद्दपार केले जायचे. पृथ्वीतलावर तेव्हा माणुसकीने ओतप्रोत भरलेली माणसेच माणसे पाहायला मिळायची. सगळीकडे माणुसकीचा बोलबाला असायचा. माणूस माणसाला माणुसकीनेच बोलायचा. एकमेकांच्या सुखदुःखात माणूस वाऱ्यासारखा धावून जायचा. एकमेकांच्या अडीअडचणी सोडवायचा. संकटकाळात एकमेकांच्या मदतीला पटकन धावून जायचा. तेव्हा मानवता हाच धर्म पाळला जायचा. माणूस एकमेकांच्या लग्न सोहळ्यात किंवा सामाजिक कार्यात हिरीरीने भाग घ्यायचा. तेव्हा गावातील कोणी माणूस मेला तर त्याच्या अंत्यविधीला सारा गाव जमायचा. आणि हळहळ व्यक्त करायचा. जड अंतःकरणातून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करायचा. तत्कालीन पाहुण्यांना गावोगावी विशेष महत्त्व दिले जायचे. पाहुणे घरी आल्यावर अतिथी देवो भव समजून त्यांचा यथोचित असा सत्कार केला जायचा. आणि मग रीतसर पाहुणचार करून त्यांना त्यांच्या गावी पाठवले जायचे.

तेव्हा आया बहिणींना वाकड्या नजरेने बघायची कोणाची हिंमत नव्हती. तेव्हा चारित्र्याला व शिलाला प्राणपणाने जपले जायचे. म्हणजे त्याकाळी एका माणसात असणारे सर्व माणुसकीचे गुण माणसांमध्ये ठासून भरलेले होते. म्हणून तेव्हाचा माणूस माणसासारखा शोभून दिसायचा. माणसासारखे वर्तन करायचा. जातीला व धर्माला मूठमाती देऊन मानवता हाच धर्म पाळायचा. रस्त्याने चालताना माणसाला शोभेल असे वर्तन करायचा. म्हणजे तेव्हाच्या माणसातील माणुसकी बावनकशी सोन्यासारखी चमकायची. म्हणून तेव्हाचा माणूस ओरिजनल माणसासारखा दिसायचा.

पण एकेकाळी माणसासारखा वागणारा व माणसासारखे वर्तन करणारा माणूस आजकाल पिसाटलेल्या कुत्र्यांसारखे वागत आहे. रानटी पशु प्रमाणे व्यवहार करत आहे. नाकात वारे शिरल्यासारखे वर्तन करून माणुसकीला कलंकित करत आहे. एकेकाळी स्त्रियांना आईची उपमा देणारा माणूस आजकाल स्त्रियांकडे वाईट दृष्टिकोनातून पाहत आहे. अल्पवयीन मुलींवर बलात्कार करून माणुसकीला काळीमा फासत आहे. आई-वडिलांना शिव्या हसाडत आहे. त्यांना पत्नीचे ऐकून घराबाहेर काढत आहे. आणि वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवत आहे. एकेकाळी माणूस मेल्यावर अंत्यविधीला गाव जमायचा पण आजकाल माणूस मेल्यावर अंत्यविधीला गावातील तर सोडाच पण भावकीतील सुद्धा काही माणसे वेळेवर येत नाहीत. ही वस्तुस्थिती कोणालाही नाकारता येणार नाही. गाडीने प्रवास करताना एखाद्या व्यक्तीचा अपघात झाला तर त्यांना हॉस्पिटलमध्ये घेऊन न जाता, त्यांचे फोटो व व्हिडिओ काढून सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आजकालची माणसे भारतात आघाडीवर आहेत. सार्वजनिक ठिकाणी एखाद्या मुलीवर वा महिलेवर बलात्कार होत असेल तर त्या महिलेला वा मुलीला त्या बलात्कारी नराधमांपासून बचावण्यासाठी कोणीही पुढे सरसावत नाही. एखादा अंध व्यक्ती रस्त्याने जात असताना नकळत वाट चुकून दुसरीकडे गेला तर त्याला त्याची योग्य वाट दाखवायला कोणीही पुढे येत नाही. बसने प्रवास करताना असे लक्षात येते की, काही अंध व्यक्तींना काही महाभाग त्यांच्या आरक्षित जागेवर बसू देत नाहीत. जणू काय ती बस यांच्या बापाचीच मालमत्ता आहे. असे त्यांना वाटते. म्हणजे माणसातील माणुसकी लयास गेली की काय? असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही.

आणि माझी मलाच माणूस असल्याची लाज वाटते. आणि शेवटी माझे मन मलाच पुटपुटते खरंच, आपण सर्वजण माणूस आहोत का? माणसासारखे वर्तन करतो का? माणसासोबत माणुसकीचे व्यवहार करतो का? आपल्या चारित्र्याला जिवापाड जपतो का? तर मला वाटते की, आजघडीला गावोगावी माणुसकीने ओतप्रोत भरलेली ओरिजनल माणसे कमी आणि मानव रूपातील हैवान जास्त दिसत आहेत. अशा मानव रुपी हैवानांचा सुळसुळाट आपल्या देशात खूप वाढला आहे. म्हणूनच आपल्या देशात जातीय तेढ निर्माण होत आहे. एकमेकांच्या धर्माला पाण्यात पाहिले जात आहे. सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजनैतिक क्षेत्रात स्वार्थी व भ्रष्टाचारी लोकांचा बोलबाला झाला आहे. म्हणजे कमालीचा स्वार्थ व भ्रष्टाचार बोकाळला आहे. धार्मिक कारणावरून जातीय दंगली घडत आहेत. गावागावांत अशांतता पसरली आहे. या सर्व गोष्टींना कारणीभूत इथला माणूस आहे. म्हणून माणसा माणसा कधी होशील रे माणूस? असे म्हणायची वेळ आता आपल्यावर येत आहे. ज्या दिवशी आपल्यातील मानव रुपी हैवान जळून खाक होतील, त्यादिवशी आपल्या देशात खरे माणसे तयार होतील. असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. म्हणून प्रत्येकाने आपल्यातील मानव रुपी हैवानाचे दहन करूया... आणि आपण सर्वजण माणूस म्हणून आनंदाने राहूया....

**-बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**मु.पो.खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# पानेवाडीत कुस्तीचा महासंग्राम!

## विजेत्यांना घाटगे पाटलांच्या मानाची बक्षिसे



**घनसावंगी । प्रतिनिधी -** तालुक्यातील पानेवाडी येथे संत सावता माळी महाराज यांच्या यात्रेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कुस्ती दंगल स्पर्धेचा बुधवारी समारोप झाला. महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आत्माराम अण्णा तिडके यांच्या प्रेरणेने साकारलेल्या या कुस्तीच्या महासंग्रामात अनेक नामवंत मल्लांनी आपल्या ताकदीचं आणि कौशल्याचं प्रदर्शन केलं, ज्यामुळे उपस्थित कुस्तीप्रेमींना रोमांचक लढतींचा अनुभव घेता आला.

या स्पर्धेतील विजेत्या पहिलवानांना समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन, लोकप्रिय नेते श्री सतीश घाटगे पाटील यांच्या हस्ते मानाची बक्षीसे प्रदान करण्यात आली. टाळ्यांच्या कडकडाटात आणि उत्साही वातावरणात हा बक्षीस वितरण सोहळा संपन्न झाला. . घाटगे पाटील यांनी विजेत्या मल्लांचे अभिनंदन केले आणि कुस्ती या पारंपरिक खेळाला प्रोत्साहन देण्याच्या आयोजकांच्या प्रयत्नांची प्रशंसा केली. त्यांनी सांगितले की, कुस्ती हा केवळ खेळ नाही, तर ती आपल्या मातीतील संस्कृती आणि शौर्याची परंपरा आहे. अशा स्पर्धांच्या माध्यमातून युवा पिढीला या परंपरेची ओळख होते आणि त्यांना प्रेरणा मिळते.

या कुस्ती दंगलीत विविध भागातून अनेक तरुण आणि अनुभवी मल्ल सहभागी झाले होते. त्यांनी आखाड्यात उतरून प्रतिस्पर्धकांना कडवे आव्हान दिले. चित्तथरारक डावपेचांनी आणि ताकदीच्या प्रदर्शनाने उपस्थितांना अक्षरशः खिळवून ठेवले होते. प्रत्येक कुस्तीनंतर टाळ्या आणि शिट्ट्यांचा गजर ऐकू येत होता, ज्यामुळे वातावरण अधिक उत्साही बनले होते.

या यशस्वी कुस्ती दंगल स्पर्धेच्या आयोजनाबद्दल बोलताना श्री. आत्माराम अण्णा तिडके म्हणाले, संत सावता माळी महाराजांच्या यात्रेच्या निमित्ताने कुस्तीची ही परंपरा जतन करण्याचा आमचा उद्देश आहे. या स्पर्धेला मिळणारा प्रतिसाद पाहून खूप आनंद झाला. युवा पिढीने मोठ्या संख्येने यात भाग घेतला, हे पाहून भविष्यातही अशा स्पर्धा आयोजित करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

पानेवाडीतील ही कुस्ती परंपरा केवळ एक खेळ नसून, ती इथल्या मातीतील शौर्य, एकता आणि परंपरेचा भाग आहे. या स्पर्धेने पुन्हा एकदा हे सिद्ध केले आहे की, कुस्ती आजही लोकांच्या मनात घर करून आहे आणि युवा पिढीला ती निश्चितच प्रेरणा देत राहील. आयोजकांनी आणि ग्रामस्थांनी या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, ज्यामुळे हा कुस्तीचा महासंग्राम यशस्वी झाला. पुढील वर्षीही अशाच उत्साहात आणि मोठ्या स्वरूपात कुस्ती दंगल आयोजित केली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## श्रेया इंटेलिजंट परीक्षेत पाटोदा शाळेचे यश

**मंठा -** पाटोदा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय आयएएस श्रेया इंटेलिजंट परीक्षा २३ फेब्रुवारी रोजी दिली होती. २४ एप्रिल रोजी राज्यस्तरीय गुणवत्ता यादी जाहीर झाली असून शाळेचे आठ विद्यार्थी राज्याच्या गुणवत्ता यादीत आले आहेत. इयत्ता पहिलीतून रुद्रांश मारोती जोशी (९), सौरभ गुणाजी नजान (९), विठ्ठल सुदाम डोळझाके (१६), अनंता गजानन चव्हाळ (१९), दुसरीतून कालिका जाधव( २७), वेदिका गजेंद्र अंभोरे(२७), तिसरीतून अर्णव डोळझाके ( ७१), यश दळवे (७२) या गुणवत्ता क्रमांकाने हे विद्यार्थी गोल्ड (३) व सिल्वर (५) मेडलसाठी पात्र ठरले असून या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांचे प्रेरक व मार्गदर्शक गंगाधर वानोळे यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. अनुजा पाटील, गीता बरसाले, संतोष तोटेवाड, देविदास मामीलवार यांनी त्यांना मार्गदर्शन केले आहे.

पान १ वरुन

### पहलगाम आतंकवादी ...

पार्श्वभूमीवर जालन्यात सुद्धा सोशल डेमॉक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाच्या वतीन कॅन्डल मार्च काढून या दुर्दैवी घटनेचा निषेध नोंदविण्यात आला. यावेळी पहलगाम हल्ल्यातील शहिदांना आणि जखमींना शासनाने मदत देऊन शहिदांच्या घरातील एका व्यक्तीला शासकीय नोकरी द्यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी सोशल डेमॉक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हा अध्यक्ष असदुल्ला रजवी, इरफान खान जिल्हा सचिव,

वीं खुर्रम खान जिल्हा कमेटी मेंबर, शेख मुस्तकीम जिल्हा कमेटी मेंबर, शफी बागवान, मसूद बागवान, शेख सईद, शेख कलीम, इमरान मिर्ज़ा, यांच्यासह अधिपदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अतिरिक्त आयुक्त ...

कारवाई करण्यात यावी. नसता वंचित बहुजन आघाडी आणि ओबीसी जनता जिल्हाभर आंदोलन करेल असा ईशारा वंचित बहुजन आघाडीने निवेदनाद्वारे पोलीस अधीक्षकांना दिला आहे.

यावेळी दिलेल्या निवेदनावर वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी ॲड. अशोक खरात, मराठवाडा उपाध्यक्ष, दिपक डोके, दिपक चाबुकस्वार, सोनाली, बबन हिवाळे यांच्या स्वाक्षऱ्या आहे.

# धाकलगावात शंकरपटाचा थरार!

## बैलगाड्यांच्या वेगवान दौडीने प्रेक्षक झाले मंत्रमुग्ध

**अंबड । प्रतिनिधी -** तालुक्यातील धाकलगाव येथे आयोजित भव्य आणि जंगी शंकरपट बुधवारी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. ढोल-ताशांच्या दणदणाटात अनेक बैलजोड्यांनी या रोमांचक शर्यतीत भाग घेतला, उपस्थित हजारो प्रेक्षकांना वेगळ्याच थराराचा अनुभव या स्पर्धे तून अनुभवता आला. लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्वांनीच या पारंपरिक खेळाचा आनंद लुटला. नागेवाडी येथील भास्कर एखंडे यांच्या पिंट्या -शंभू या बैलजोडीने ५ सेकंदात शर्यतीचे अंतर पार करून प्रथम विजेत्याचा मान पटकावला. तर रामनगर येथील रुबाब - गारुडा या बैल्जोडीने ५ .६३ सेकंदात मैदान मारत दुसरा क्रमांक मिळवला. तर तिसरा क्रमांक धाकलगाव येथील कैलास गाढे यांच्या सत्यम - शंकर जोडीने मिळवला.

या शंकरपट स्पर्धे साठी धाकलगाव आणि आसपासच्या गावांतील शेतकऱ्यांनी आपल्या उत्कृष्ट आणि वेगवान बैलजोड्या सज्ज केल्या होत्या. बैलांना आकर्षक रंगांनी सजवण्यात आले होते आणि त्यांच्या गळ्यातील घुंगरांचा आवाज वातावरणात एक विशेष उत्साह निर्माण करत होता. शर्यतीच्या सुरुवातीपासूनच बैलजोड्यांनी वेग धरला आणि धुरळ्याच्या वादळात आपली वेगळी ओळख निर्माण केली. या स्पर्धेत अनेक रोमांचक आणि चुरशीच्या लढती पाहायला मिळाल्या. काही बैलजोड्यांनी सुरुवातीपासून आघाडी घेतली, तर काहींनी शेवटच्या क्षणी बाजी मारली. प्रेक्षक प्रत्येक क्षणाचा आनंद घेत होते आणि आपल्या आवडत्या बैलजोडीला जोरदार प्रोत्साहन देत होते. शर्यतीच्या मार्गावर उभे असलेले नागरिक टाळ्या आणि शिट्ट्या वाजवून मल्लांचे आणि त्यांच्या बैलांचे मनोबल वाढवत होते.

स्पर्धेच्या अंतिम टप्प्यात, ज्या बैलजोडीने उत्कृष्ट सम न्वय आणि वेग दाखवला, तिने प्रथम क्रमांक पटकावला. समृद्धी साखर कारखान्याच्या वतीने या विजेत्या बैलजोडीला आकर्षक बक्षीस देण्यात आले. कारखान्याचे चेअरमन, लोकप्रिय नेते श्री सतीश घाटगे पाटील यांच्या सौजन्याने



तब्बल ३१,००० रुपयांचे पारितोषिक विजेत्यांना प्रदान करण्यात आले.

बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन उत्साहात करण्यात आले होते. उपसभापती श्री अरुण घुगे आणि भारतीय जनता पक्षाचे तालुका अध्यक्ष श्री शिवाजी नाना मोरे यांच्या हस्ते विजेत्या बैलजोडीचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी बोलताना श्री. अरुण घुगे म्हणाले, शंकरपट हा आपल्या ग्रामीण भागातील एक महत्त्वाचा आणि पारंपरिक खेळ आहे. या खेळातून शेतकऱ्यांची आपल्या बैलांवरील निष्ठा आणि प्रेम दिसून येते. धाकलगावातील ही स्पर्धा यशस्वीपणे पार पडल्याबद्दल मी आयोजकांचे अभिनंदन करतो.

श्री. शिवाजी नाना मोरे यांनी विजेत्या बैलजोडीचे अभिनंदन केले आणि सांगितले की, अशा स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील लोकांना एकत्र येण्याची संधी मिळते आणि पारंपरिक संस्कृती जतन राहते. युवा पिढीलाही आपल्या संस्कृतीची ओळख होते, हे खूप महत्त्वाचे आहे.

या शंकरपट स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी धाकलगावातील ग्रामस्थ आणि आयोजकांनी अथक परिश्रम घेतले. त्यांनी शर्यतीचा मार्ग व्यवस्थित तयार केला होता आणि प्रेक्षकांसाठी योग्य सोय उपलब्ध करून दिली होती. स्वयंसेवकांनीही चोख व्यवस्थापन करत कोणतीही अडचण येऊ दिली नाही.

एकंदरीत, धाकलगावातील हा शंकरपट एक अविस्मरणीय अनुभव ठरला. बैलजोड्यांच्या वेगवान दौडीने आणि प्रेक्षकांच्या उत्साहाने संपूर्ण परिसर भारलेला होता. या स्पर्धेने पुन्हा एकदा सिद्ध केले की, आजही ग्रामीण भागात पारंपरिक खेळांची लोकप्रियता कायम आहे आणि लोक मोठ्या संख्येने यात सहभागी होण्यास उत्सुक असतात. विजेत्या बैलजोडीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे आणि पुढील वर्षी होणाऱ्या शंकरपटाची उत्सुकता आतापासूनच लागली आहे.

# पाण्याच्या शोधात भटकंती करणाऱ्या काळवीटचा विहिरीत पडून मृत्यू



**जालना । प्रतिनिधी -** पाण्याच्या शोधात भटकंती करणाऱ्या काळवीटाचा विहिरीत पडून मृत्यू,वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांच्या मदतीने विहिरीबाहेर काढलं काळवीट,नागेवाडी शिवारातील घटना आज दिनांक २४ गुरुवर रोजी दुपारी चार वाजता मिळालेल्या माहितीनुसार पाण्याच्या शोधात भटकंती करणाऱ्या एका काळवीटाचा विहिरीत पडून मृत्यू झालाय. जालन्यातील नागेवाडी ही घटना घडलीय.रामकिशन पारे यांच्या शेतातील विहिरीत हे मृतावस्थेतील काळवीट आढळून आलं. आज सकाळी पारे हे मोटर चालू करण्यासाठी विहीरीवर गेले असताना विहिरीमध्ये काळवीट पडल्याचं दिसून आलं. त्यांनी तात्काळ वन विभागाला याची माहिती दिली.सध्या या परिसरात भटकंती करणाऱ्या प्राण्यांसाठी पाणी नसल्यानं प्राणी पाण्यासाठी वणवण भटकत आहेत.पाण्यासाठी भटकत असताना हे काळवीट विहिरीमध्ये पडलं असावं असा स्थानिकांचा अंदाज आहे.
वन विभागाचे अधिकारी कैलास नागरगोजे, राऊत , बालाजी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्पमित्र विशाल गायकवाड, शेख आरिफ, अरिफ खान यांनी स्थानिक शेतकऱ्यांच्या मदतीने काळविटास विहिरीतून बाहेर काढून वनपरिक्षेत्र कार्यालय येथे पुढील कारवाई करिता घेऊन गेले असल्याची माहिती आहे.यावेळी घटनास्थळी चंदनझीरा प्रभागाचे नगरसेवक गणेश राऊत, माळीमहासंघाचे जिल्हाध्यक्ष संतोष रासवे, शेतकरी रामकिशन पारे, सुरेश एखंडे, अशोक पारे, विजय पारे, रामेश्वर गाडेकर, संतोष डोके, रमेश मोठे, हिरालाल मोठे यांच्यासह इतर शेतकरी उपस्थित होते.

# डॉ.आकाश गोरे यांचा भास्कर दानवे यांच्या हस्ते सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील भाटेपुरी येथील डॉ.आकाश पुंजाराम गोरे यांची केंद्रीय लोकसेवा आयोग २०२४ मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये देशात ५०० वा क्रमांक मिळवला आहे त्यांच्या या यशाबद्दल विधानसभा प्रमुख श्री.भास्कर आबा दानवे यांनी त्यांचा सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या वेळी सरचिटणीस श्री.सिद्धिविनायक मुळे, जालना तालुकाध्यक्ष श्री.संजय डोंगरे, श्री.संजय आटोळे,श्री.निवृत्ती लंके, विकास कदम श्री.दौलत भुतेकर,प्रतीक पोहेकर उद्धव ढवळे,बंटी ढवळे,ओम कळकुंबे व गावकरी मोठ्या संख्येने आदिजन उपस्थित होते.

# पाकिस्तानचा माज उतरवण्याची हीच खरी वेळ - माजीमंत्री आमदार लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** भारताचा स्वर्ग म्हणून संबोधल्या जाणाऱ्या जम्मू-काश्मीर मधील पहलगाम या ठिकाणी पाकिस्तानच्या दहशतवादी संघटनांकडून काल भीषण दहशतवादी हल्ला करण्यात आला. उन्हाळी सुट्टयांचा आनंद लुटण्यासाठी आलेल्या पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून दहशतवाद्यांनी गोळ्या झाडल्या. अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. जम्मू-काश्मीरमधील अलीकडच्या काळात झालेला हा सर्वात भीषण दहशतवादी हल्ला आहे. २६ पर्यटकांचा या दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झाला आहे. पहलगाम हे काश्म ीरमधील पर्यटन स्थळ आहे. इथे नेहमीच पर्यटकांची गर्दी असते. काल दुपारी इथे मोठ्या संख्येने पर्यटक असताना हा दहशतवादी हल्ला झाला. पहलगामच्या सौंदर्याला काल रक्तरंजित करण्यात आलं.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी गृहमंत्री श्री अमित शहा यांनी याबाबत कठोर भूमिका घेऊन पाकिस्तानला नेस्तनाबूत करण्यासाठी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. भारत सरकारच्या वतीने भारतीय सैन्याला आपले निर्णय स्वतः घेण्याची पूर्ण मुभा दिलेली आहेच परंतु याहीपेक्षा कठोरातील कठोर भूमिका घेऊन अतिरेक्यांना आणि अतिरेक्यांना आणि पाकिस्तानला अद्दल घडवण्याची हीच वेळ आहे. भारत सर्व दृष्टिकोनातून सक्षम असून या अतिरेकी हल्ल्याचा भारताकडून नक्कीच सर्जिकल स्ट्राइक सारखे उत्तर मिळेल. पंतप्रधान नरेंद्र म ोदी देशाचे गृहमंत्री अमित शहा आणि भारतीय सैन्यावर देशभक्त भारतीयांचा १००% विश्वास असल्याचे आ. बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे.




## परतूर येथे ‘अमृत स्वायत्त संस्था’ची बैठक;

# आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती



**परतूर । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या ‘अमृत स्वायत्त संस्था’ची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच परतूर येथील श्री गजानन महाराज मंदिर परिसरात यशस्वीरित्या पार पडली. या बैठकीत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यात आली.

‘अमृत तुमच्या दारी’ या ब्रीदवाक्याला अनुसरून अमृत परिवार नोंदणी, विद्यार्थ्यांसाठी अमृत क्लब, महिलांसाठी अमृत सखी मंच, तसेच व्यवसायिकांसाठी अमृत पेठ, म ार्गदर्शन कार्यशाळा, सांस्कृतिक स्पर्धा अशा अनेक उपक्रमांची सविस्तर माहिती अमृतचे व्यवस्थापक ,अक्षय लंबे यांनी याप्रसंगी दिली.

लंबे यांनी यावेळी सांगितले की, आपला उद्देश १०० टक्के पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनांची माहिती पोहोचवण्याचा आहे. एकही पात्र लाभार्थी योजनांपासून वंचित राहू नये, यासाठी संपूर्ण प्रयत्न केले जात आहेत.

या बैठकीस व्यापारी महासंघाचे सुरेश मंत्री, गोविंद झंवर, राजेश अग्रवाल, आयुष मुंदडा, निखिल अग्रवाल, शुभम वट्टमवार, अमृत मित्र सखाराम कुलकर्णी, अमृत उपव्यवस्थापक चिंतेश जोशी, आणि अमृत सह व्यवस्थापक सत्यम अग्रवाल, तसेच अन्य मान्यवर नागरिक उपस्थित होते.

या उपक्रमांमुळे परतूर तालुक्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जागतिक हिवताप दिनानिमित्त २५ एप्रिल रोजी मोहिमेचे आयोजन

**जालना -** जागतिक हिवताप दिन म्हणुन २५ एप्रिल हा दिवस साजरा करण्यात येतो. चला हिवतापाला संपवु या,पुन्हा योगदान द्या,पुन्हा विचार करा,पुन्हा सक्रिय व्हा’ हे या वर्षीचे घोषवाक्य आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार,भारतामध्ये सन २०२७ पर्यंत हिवताप दुरीकरण करण्याचे ठरविले आहे. संपुर्ण जिल्ह्यामध्ये दि.२५ एप्रिल २०२५ रोजी राबविण्यात येणाऱ्या मोहिमेसाठी आरोग्य यंत्रणेला सहकार्य करावे. तसेच हिवताप, डेंग्यु, चिकुणगुन्या व किटकजन्य आजारापासुन संरक्षण मिळविण्यासाठी या मोहिम काळातच नाही तर नेहमीसाठी आपल्या सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवावा.घरातील पाणीसाठयावर झाकण ठेवावे,नाल्या,गटारे वाहते ठेवावे. आठवडयातुन एक दिवस कोरडा दिवस म्हणुन पाळावा,मच्छर दानीचा वापर करावा,उघडया खिडक्यांना जाळया बसवावे, संडासच्या व्हेंट पाईपला जाळी बसवावी, भंगार सामान व रिकामी टायर यांची विल्हेवाट लावावी, कुलर फ्रिजच्या ड्रिपमधील पाणी स्वच्छ करावे,पाण्याचा हौद, टाक्या, रांजन आदि दर आठवड्याला स्वच्छ करावेत. थंडी वाजुन ताप येणे, मळमळ होणे, डोके दुखणे, अंगदुखी इत्यादी हिवतापाची लक्षणे आढळुन आल्यास जवळच्या आरोग्य संस्थेत संबंधीत वैद्यकिय अधिकारी यांच्या मार्फत तपासणी करुन योग्य औषध उपचार घ्यावा, असे जिल्हा हिवताप अधिकारी जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# भाजपा जालना महानगर मंडळाच्या नवनियुक्त अध्यक्षांचा माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्हा अंतर्गत चार मंडळाच्या नियुक्त्या (ता.२०) जाहीर करण्यात आल्या असून यात नवीन जालना मंडळ अध्यक्ष श्री.सुनील खरे, जुना जालना मंडळ अध्यक्ष श्री.महेश निकम, पूर्व जालना मंडळ अध्यक्ष श्री.अमोल धानुरे महानगर ग्रामीण मंडळ अध्यक्ष पदी संजय डोंगरे यांचा सत्कार करून माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व पक्ष तत्त्वांना समर्पित राहून पक्ष संघटनाचे, जनसेवेचे अधिकाधिक कार्य आपल्या हातून संपन्न होईल असा विश्वास व्यक्त केला. यावेळी बदनापूर विधानसभा मतदारसंघाचे आ. नारायण कुचे, जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे, भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, महानगर अध्यक्ष सतीश जाधव, अशोक पांगारकर, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, जिल्हा उपाध्यक्ष धनराज काबिलिये, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष कपिल दहेकर, उद्योजक अर्जुन गेही, बबन नाना सिरसाठ, मुकेश चव्हाण, निवृत्ती लंके, रोहित नलावडे, दौलत भुतेकर, उद्धव ढवळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# भस्मांचल चे पहिले पोस्टर चेन्नईत लाँच

**मुंबई -** भस्मांचलचे पहिले पोस्टर - ४०+ कलाकारांचा समावेश असलेला एक हार्ड हिटिंग हिंदी मेगा ड्रामा - चेन्नईतील ऋद्ध हॉटेलमध्ये आज अधिकृतपणे लाँच करण्यात आले.
वृद्धाश्रम आणि अनाथाश्रम या विषयावर आधारित हे नाटक प्रसिद्ध मल्याळम नाटक खनालशिखाराम यांच्यापासून प्रेरित आहे. संपूर्ण भारतात, विशेषत: मुंबई आणि इतर शहरांमध्ये १५ ते २० स्टेज परफॉर्मन्ससह राष्ट्रीय दौरा नियोजित आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.